# कार्यालय, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.भुम

दुरध्वनी क्रमांक ०२४७८ २७२०१३ ईमेल आयडी - arbhoom@gmail.com


333 जाक्र.नियंत्रण /प्रशासक म/ नेमणुक/ सन २०१७ दिनांक :-29/०८/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (पोटकलम (१४) व ७३ आय (१) (२)व ७७ अ अन्वये आदेश

वाचा :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (पोटकलम (१४) व ७३ आय (१) (२ ) व ७७ अ

२. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,उस्मानाबाद यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.२६५९ दिनांक १०.०८.२०१७

३.श्री.बी.जे.मेटे ,मुख्य लिपीक यांचा अहवाल दिनांक १९.०८.२०१७

४.संस्थेचे सभासदांचे पत्र दिनांक २९.०८.२०१७

ज्याअर्थी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.सुकटा ता.भुम या संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत सपंल्यामुळे नविन संचालक मंडळ अस्तित्वात येणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ अन्वये या कार्यालयाकडुन निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वेळोवेळी आपल्या संस्थेला भेट देवून निवडणूक घेण्याबाबत प्राथमिक मतदार यादी व निवडणूक निधी या बाबत लेखी व तोंडी विचारणा केलेली आहे. या कार्यालयाने निवडणूक घेण्याच्या दृष्टीकोणातून आपल्या संस्थेची प्राथमिक मतदार यादी सादर करणे बाबत आणि नियमानुसार निवडणूक निधी मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे खातेवर भरणा करणे बाबत सुचित केलेले आहे. संस्थेने निवडणूक निर्णय अधिकारी तसेच तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी वेळोवेळी लेखी व तोंडी सुचित केल्या प्रमाणे त्या बाबतची कोणतीही कार्यवाही न करता निवडणूक घेण्यास टाळाटाळ केलेली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.०३ अन्वये मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांचे पत्रान्वये मा.मंत्री ,सहकार पणन व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे प्रशासकीय मंडळ नियुक्तीबाबतचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.४ अन्वये प्रशासकीय मंडळ नेमणुकीबाबत या कार्यालयाचे मुख्य लिपीक यांनी पात्रतेबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

ज्याअर्थी संस्थेचे प्रशासक यांचेकडुन संस्थेचे कामकाज करण्याकरिता विलंब होत आहे. गैरसोई होत आहे असे पत्र संदर्भ क्र.०५ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाले आहे.व संदर्भ क्र.०३ अन्वये या कार्यालयास प्राप्त यादीतील तीन व्यक्तींचे प्रशासकीय मंडळ नियुक्तीबाबत नाहरकत असलेचे या कार्यालयास कळविण्यात आले आहे.

त्याअर्थी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### आदेश

मी एम.एल.शिंदे ,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (२) (३) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.सुकटा या संस्थेचे प्रशासक ऐवजी अंशतः बदल करुन प्रशासकीय मंडळ म्हणुन १. मधुकर दत्तु अर्जुन २. नितीन श्रीमंत भडके ३. विठ्ठल दशरथ सातपुते यांची नियुक्ती करीत आहे.

Shinde

(एम.एल.शिंदे)

**सहाय्यक निबंधक**

**सहकारी संस्था ता.भुम**

**प्रत,**

१. प्रशासक, विविध कार्य.सेवा सहकारी संस्था मर्या.सुकटा ता.भुम यांना देवुन सुचित करण्यात येते कि, आपण संस्थेचा पद्‌भार प्रशासकीय मंडळाकडे सुपुर्त करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. १. मधुकर दत्तु अर्जुन २. नितीन श्रीमंत भडके ३. विठ्ठल दशरथ सातपुत प्रशासक मंडळ सदस्य यांना देवुन सुचित करण्यात येते कि आपण संस्थेचा पद्‌भार घेवुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.